**INDEX : 2018-19**


| | | |
|---|---|---|
| | **RESEARCH PAPER PUBLISHED** | |
| 1 | Ashaskiy Sanghatana Va Vikas | 208-212 |
| 2 | GramPanchayat Prashasana madhe Gram Sabhechi Bhumika | 213-217 |
| 3 | Swachha Bharat Abhiyan Ek Drishtikshep | 218-221 |
| 4 | Gramin Vikasat Jalyukta Shivar Karyakramache Yogdan | 222-226 |
| | **RESEARCH GUIDANCE** | |
| 1 | Ph.D Awarded (Student-01) | 227 |
| | **CONFERENCES/ SEMINAR PAPER PUBLISHED** | |
| 1 | CBCS Pattern in P.A. (Resource Person) | 228-229 |
| 2 | Disaster Management SEC- 3rd (Guest Lecture) | 230 |
| 3 | Padvyuttar Samantran Varga MA –I II (Guest Lecture) | 231 |
| 4 | 21 vya shatakatil lokshahi samoril aavhane (Paper Presented) | 232 |


Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

208

ISSN 2250-169X

IMPACT FACTOR 6.014

*International Registered & Recognized*
*Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# VISION RESEARCH REVIEW

**UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL**

Issue - XV, Vol. - I
Year-IX, Bi-Annual(Half Yearly)
(June 2018 To Nov. 2018)

**CHIEF EDITOR**
Dr. Balaji G. Kamble
Research Guide & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur. (M.S.)India.

**SPECIAL EDITOR**
Dr. E. Sivanagi Reddy
'Sthapathi'
Dept of Archaeology & Museums,
Hyderabad (A.P.)

**EXECUTIVE EDITORS**

Michael Strayss,
Director,
International Relation & Diplomacy,
Schiller International University,
Paris. (France)

Verena Blechinger Talcott
Director, Dept. of History
& Cultural Studies, University of Berlin,
Berlin. (Jermany)

Dr. Raja Reddy
Former, Director, N.I.M.S.
Hyderabad(A.P.)&
World Famous Neurosurgeon

Bhujang R. Bobade
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Institute, Hyderabad. (A.P.)

Dr. Arjun Jadhav
Dept. of Eglish,
Furgusion College,
Pune, Dist. Pune

Dr. Sarjerao Shinde
Principal,
B.K.D. College,
Chakur, Dist. Latur(M.S)

**DEPUTY EDITORS**

Dr. Ashok G. Chaskar
Head, Dept. of Eglish,
S.P. College, Pune &
Dean, Faculty of Arts & Fine Arts, University of
Pune, Dist. Pune.

Dr. M. Veeraprasad
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, Dist. Anantpur (A.P.)

Prof. Shrikant A. Jewale
Dept. of Geography,
Gramin Mahavidyalaya,
Vasantnagar, Dist. Nanded (MS)

Dr. Omshiva V. Ligade
Head, Dept. of History
Shivjagruti College, Nalegaon,
Dist. Latur. (M.S.)

Dr. Dr. Mahadeo S. Kamble
Dept. of History
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

Prashant B. Kshirasagar
Dept. of Marathi,
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

**CO - EDITORS**

Dr. Allabaksha Jamadar
Chairman, BOS,Hindi, SRTMUN &
Head, Dept. of Hindi,
B.K.D. College,
Chakur, Dist. Latur(M.S.)

Dr. Murlidhar Lahade
Dept. of Hindi,
Janvikas Mahavidyalaya,
Bansarola, Dist. Beed (M.S.)

Dr. S.B. Wadekar
Sharadchandra Arts, Com., & Sci. College,
Naigaon (Bz), Dist. Nanded. (M.S.)

Dr. Shivaji Vaidhya
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani, Dist. Parbhani (M.S.)

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382 -241913
9423346913 / 7276301000
9637935252 / 9503814000

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@ gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published By :**
Jyotichandra Publication
Latur, Dist. Latur - 413531. (M.S.)

Price : ₹ 200/-

Co-ordinator

Estd.1983

PRINCIPAL

Scanned by CamScanner

Issue : XV, Vol. I
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 6.014
ISSN 2250-169X
June 2018 To Nov. 2018

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | Rural Transformation in 12th Plan<br>**Dr. Rita Deshmukh** | 1 |
| 2 | Banking Reforms Since 1991<br>**Dr. D. K. Rathod** | 8 |
| 3 | Recent Initiatives in Agriculture Sector<br>**Dr. Balaji G. Kamble** | 13 |
| 4 | Development of Standardized Education Package About Functional Foods And Health<br>**Dr. V. H Bhatkar** | 20 |
| 5 | Studies on Fish Diversity of Kunsawali Tank, Osmanabad (M.S.) India<br>**P. L. Sawant, M.G. Babare** | 29 |
| 6 | 'वारिस' की चाहत में स्त्री भ्रूण हत्या<br>**डॉ. प्रविण कांबळे** | 31 |
| 7 | हिंदी कथा साहित्य में देश विभाजन की त्रासदी का चित्रण<br>**डॉ. एम. डी. इंगोले** | 34 |
| 8 | यमुना पर्यटन या कादंबरीतील श्रध्देचा अभ्यास<br>**उन्मेष शेकडे** | 39 |
| 9 | अशासकीय संघटना व विकास<br>**डॉ. पी. व्ही. भुताळे** | 43 |
| 10 | स्थानिक स्वराज्य संस्था<br>**जयश्री सिनगर** | 46 |



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Mandal's Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna
Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani

Scanned by CamScanner

Issue : XV, Vol. I
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 6.014
ISSN 2250-169X
June 2018 To Nov. 2018 | 43

9

# अशासकीय संघटना व विकास

डॉ. पी. व्ही. भुताळे
लोकप्रशासन विभाग,
श्री. गुरु बुध्दीस्वामी महाविद्यालय,
पूर्णा, जि. परभणी

## Research Paper - Public Administration

जगातील प्रत्येक देशातील नागरिकांच्या कल्याणाची जबाबदारी ही त्या - त्या देशातील शासन यंत्रणेची असते. शासन यंत्रणेद्वारे लोकांच्या विकासाच्या व कल्याणाच्या विविध योजना आखल्या जातात व त्या प्रभावीपणे राबविण्याचा देखील प्रयत्न केला जातो. परंतु जेव्हा शासन यंत्रणा लोकांचा विकास साधण्यात व गरजा भागविण्यात कमी पडते. तेव्हा समाजाचा विकास खुंटतो. तेव्हा अलीकडील काळात अनेक संस्था व अशासकीय संघटना NGO's पुढे येवून समाज विकासाची कार्य करित आहेत.

**ग्रामीण विकासात अशासकीय संघटनांची भूमिका :-**

भारतातील अशासकीय संघटना एकत्र येवून एका फेडरेशनची स्थापना केली आहे. ग्रामीण भागाचे प्रश्न, गरजा, समस्यांचा विचार करतात. समन्वयातून ते प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतात. ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात काम करणारी (AWARD) नावाचे फेडरेशन आहे. (Association of Voluntary Agencies in Rural Development) हे असून याचे मुख्य कार्यालय दिल्ली येथे आहे. सोसायटी Act १८६० अंतर्गत स्थापन केली असून याचे १२ सदस्य आहेत.

१. अशासकीय संघटनेच्या सहकार्याने ग्रामीण भागाचा विकास करणे.
२. ग्रामीण विकासाचे प्रयत्न करणे.
३. ग्रामीण विकासाची माहिती लोकापर्यंत पोहचविणे.
४. परीषदा व चर्चासत्राचे आयोजन करुन ग्रामीण समस्येसंबंधी सर्व अशासकीय संघटनाना एकत्रीत करुन या समस्या सोडविण्याबाबत यांच्यासोबत चर्चा करणे.

Co-ordinator

Estd.1983

PRINCIPAL

Issue : XV, Vol. I
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 6. 014
ISSN 2250-169X
June 2018 To Nov. 2018 44

५. ग्रामीण समाजाच्या विकासासाठी निधीची उभारणी करणे.

६. ग्रामीण विकास क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या भारतातील व विदेशातील संघटना बरोबर समन्वय साधून त्यांच्या बरोबर संपर्क निर्माण करणे.

**दुर्बल घटकांच्या विकासात अशासकीय संघटनाची भूमिका :-**

१८१० मध्ये कलकत्ता येथे कुष्ठरोगाने ग्रस्त असणाऱ्या लोकाना NGO's ने सर्व प्रथम मदत केली. १८२६ अंध लोकासाठी राजाकाली शंकर घोसाल यांनी ईस्ट इंडिया कंपनीकडून निधी घेऊन त्यांच्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. दुर्बल घटकांच्या पुनर्वसन कार्यामध्ये NGO's ची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अलीकडे आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय संस्था दुर्बल घटकांच्या पुनर्वसनासाठी आर्थिक मदत देत आहेत. जागतिक बँक, जागतिक आरोग्य संघटना, युनिसेफ, आंतरराष्ट्रीय कामगार संघटना इत्यादी प्रमुख संस्थांचा समावेश आहे. भारताचे सामाजिक न्याय मंत्रालय देखील NGO's च्या मदतीने दीन दयाळ पुनर्वसन योजने अंतर्गत दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी निधी उपलब्ध करुन देत आहेत.

**महिला विकासातील NGO's ची भूमिका :-**

स्त्री मुक्ती, स्त्री-पुरुष समानता, महिला सबलीकरण या संकल्पना आज आपणास नव्या नाहीत. स्त्री विकासाची जाण ही संयुक्त राष्ट्रांनी १९७५ हे वर्ष आंतराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित केले व स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय समाजातील स्त्री जीवनाशी संबंधीत महत्त्वाचा प्रश्नावर चर्चा सुरु झाली. राजा राममोहन रॉय, केशवचंद्र सेन, ईश्वरचंद्र विद्यासागर, गोपाल हरि देशमुख, महात्मा ज्योतीबा फुले, आगरकर, रानडे, डॉ. आनंदी बाई जोशी, महात्मा गांधी, लक्ष्मीबाई टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृतीशील योगदानामुळे भारतीय समाजाकडे प्रबोधनाची परंपरा विकसित झाली.

समाजातील ५० टक्के घटक असलेल्या स्त्रियांच्या प्रश्नांचा फारसा विचार न करताच स्वातंत्र्यानंतर पहिल्या २५ वर्षातील आर्थिक विकासाचे धोरण तयार केले. स्त्रियांच्या वाट्याला दुःखच असल्याचे दिसून येते. राजकारणात स्थान दिले मात्र त्याचे अधिकार पुरुषच वापरतात सहभाग कमी दिसून येतो. तेव्हा संघटित पध्दतीने स्त्री जागृती केल्याशिवाय स्त्रियांच्या वाट्याला येणारे अन्याय, अत्याचार, छळ, विषय दूर होणार नाही. आज NGO's स्त्री साक्षरतेसाठी काम करित आहेत. पाणी, निवारा, रोजगार इत्यादी प्रश्नावर लढा देत आहेत. म्हणूनच आज प्रसारमाध्यमे, साहित्य, क्षेत्र, कला वरील विविध राजकीय पक्षाच्या आघाडी मध्ये महिलांची स्वतंत्र आघाडी निर्माण केली आहे.

Coordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha's Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn) Estd. 1963

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

Scanned by CamScanner

Issue : XV, Vol. I
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 6.014
ISSN 2250-169X
June 2018 To Nov. 2018 45

मुलांच्या विकासात अशासकीय संघटनांची भूमिका :-

मुले ही प्रत्येक राष्ट्राची संपत्ती असते. कारण यांच्यावरच देशाचे भवितव्य अवलंबून असते. अनेक कारणामुळे जगात मुलाचे भवितव्य सुरक्षित नसल्याचे दिसून येते. विकसनशील देशात तर दरवर्षी १५ दशलक्ष मुले मृत्यूमुखी पडतात. १२० मुले प्रत्येक मिनिटाला जन्म घेतात. भारतात पाच वर्षाखालील ७५ दसलक्ष मुले कुपोषित आहेत. जन्मलेल्या ३ पैकी १ मुल कमी वजनाचे आहे. तेव्हा जन्मास येणाऱ्या प्रत्येक मुलास आरोग्य, पोषण आहार, शिक्षण संरक्षण मिळत नाही. तेव्हा NGO's ची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. मिशनरिज व दानकार्य करणाऱ्या संस्थांनी अनाथ मुलांसाठी शिक्षणाची केंद्रे सेवाभावी वृत्तीतून सुरु केले आहे. रामकृष्ण मिशन, मुस्लीम बोर्ड, मुस्लिम शैक्षणिक ट्रस्ट, आर्य समाज, हिंदु, शिख, जैन व पारसी यांच्या चॅरिटेबल ट्रस्ट, नारायण सेवा भावी संस्था अपंग मुलांना सेवा देते.

सारांश :-

आधुनिक काळात लोकशाही व कल्याणकारी राज्याचा स्विकार करुनही समाजातील विविध घटकांच्या विकासाची कामे लोकशाहीतील शासन व प्रशासन करु शकत नाही किंवा म्हणावे तेवढे यश गेली ७ दशकात मिळालेले नाही. तेव्हा समाजातील कांही NGO's स्त्री, मुले, वृध्द, वंचित, गरिब, दलित आदिवासी इत्यादीच्या कल्याणासाठी सेवाभावाने आज प्रामाणिकपणे कार्य करीत आहेत. मात्र खरी जबाबदारी सत्ताधारी शासनाची असते. आज याबाबत शासन व प्रशासन अकार्यक्षम व उदासिन दिसून येते.

## संदर्भ सूची :-

१. आपत्ती व्यवस्थापन : डॉ. उर्मिला रेड्डी
२. नव लोकप्रशासन : डॉ. पंचशिल एकंबेकर
३. लोकप्रशासन : डॉ. कटारिया

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna
Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

RNI MAHMAR/2013/2018/35846 IMPACT FACTOR -5.00 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH
Issue : XVII, Vol. II, Nov. 2018 To April 2019

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | Contribution of GST in National Income<br>**Dr. Nilam Chhangani** | 1 |
| 2 | A Study Of Causes And Economics Of Delay In Judiciary<br>**M. S. Mittha** | 6 |
| 3 | Fundamentals Of Research<br>**M. P. Shikare** | 11 |
| 4 | Dynamics of Federalism in India and Its Challenges<br>**Dr. V. R. Kodape** | 15 |
| 5 | Effect of Excercise Training Programme on Explosive Strength of Leg Performance of Volleyball Player<br>**Rajendra N. Sadhane, Dr. Rajeshwar V. Patil** | 22 |
| 6 | राष्ट्रीयकृत बँकांची बुडीत कर्ज व सर्वसामान्य गुंतवणूकदारांचा वाढता पेच<br>**डॉ. एस. यु. मंडले** | 26 |
| 7 | सिंधू संस्कृतीतील लोकांची आर्थिक स्थिती<br>**डॉ.सी. एस. जगताप** | 30 |
| 8 | हैदराबाद मुक्तिसंग्राम<br>**डॉ. शिवाजी हरी चौगुले** | 33 |
| 9 | राममनोहर लोहिया यांचे जीवनपट, त्यांचे कार्य व मुल्यांकन<br>**वैशाली निळकंठराव धोत्रे** | 39 |
| 10 | खो-खो मुले संघ निवड चाचणीसाठी प्रमाणित शारीरिक क्षमता चाचणी निर्माण करून मानके तयार करणे<br>**अंजली बरडे** | 47 |
| 11 | थोर समाज सुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी विचारांचा अभ्यास<br>**डॉ. संभाजी संतोष पाटील** | 51 |
| 12 | ग्रामपंचायत प्रशासनामध्ये ग्रामसभेची भूमिका<br>**डॉ. पी. व्ही. गुताळे** | 59 |


Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani

Scanned by CamScanner

215



**12**

# ग्रामपंचायत प्रशासनामध्ये ग्रामसभेची भूमिका

डॉ. पी. व्ही. भुताळे
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
श्री. गुरुबुद्धीस्वामी महाविद्यालय,
पूर्णा, जि. परभणी

*Research Paper - Public Administration*

लोकशाहीत सत्तेच्या विकेंद्रीकरणाला विशेष महत्व असते. म्हणजे लोकांची सत्ता ही जास्तीत जास्त लोकांपर्यंत प्यावी यासाठी लोकशाही विकेंद्रीकरणाचे समर्थन केले आहे. महाराष्ट्रात वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली २७ जून १९६० ला समिती स्थापन केली होती. या समितीने १५ मार्च १९६१ ला आपला अहवाल सादर केला व ५ मार्च १९६२ रोजी राष्ट्रपतीकडून मान्यता मिळाली व महाराष्ट्रात १ मे १९६२ ला त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था जन्माला आली.

स्थानिक स्तरावर, स्थानिक प्रश्न सोडविण्यासाठी पंचायतराज व्यवस्थेच्या रुपात संवैधानिक संस्था जन्माला आल्या. पंचायतराज व्यवस्था ही प्रामुख्याने ग्रामिण भागाच्या विकासासाठी निर्माण केल्या. जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हा परिषद, तालुक्याच्या ठिकाणी पंचायत समिती तर गाव पातळीवर ग्रामपंचायत प्रशासन निर्माण केले.

पंचायत राज व्यवस्थेत ग्रामपंचायत प्रशासन हे सर्वात अखेरचा आणि महत्वाचा घटक म्हणून ओळखला जातो. भारतिय राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वातील कलम ४० मध्ये ग्रामपंचायतीचा उल्लेख आहे. ७३ व्या घटना दुरुस्तीने या व्यवस्थेला घटनात्मक दर्जा व सुरक्षा मिळाले आहे.

सध्या महाराष्ट्रात २९ हजार ग्रामपंचायती आहेत. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ५ नुसार प्रत्येक खेडे किंवा खेड्याचा समुह यासाठी ग्रामपंचायत स्थापन केली जाते. ग्रामपंचायत सदस्यांची संख्या कमीत कमी ७ व जास्तीत जास्त १७ असते. ग्रामपंचायतीची निवडणूक ही प्रत्यक्ष व प्रौढ मतदानामार्फत होते. अनुसूचित जाती, जमाती आणि महिला यासाठी

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak ... Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya ... Estd.1993

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

Scanned by CamScanner

RNI MAHMUL03937/2010/35848 IMPACT FACTOR - 5.99 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH Issue : XVII, Vol. II, Nov. 2018 To April 2019 

घटनेने आरक्षण दिलेले आहे. ग्रामपंचायतीचा कार्यकाळ हा ५ वर्षाचा असतो.

| अ.क्र. | लोकसंख्या | सदस्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | १५०० किंवा पेक्षा कमी | ७ |
| २ | १५०० ते ३००० | ९ |
| ३ | ३००१ ते ४५०० | ११ |
| ४ | ४५०१ ते ६००० | १३ |
| ५ | ६००१ ते ७५०० | १५ |
| ६ | ७५०१ ते पेक्षा अधिक | १७ |

**ग्रामसभा :**

भारतिय राज्यघटनेतील कलम २४३ (क) नुसार गावासाठी ग्रामसभेला संवैधानिक अधिकार दिलेला आहे. गावातील सर्व प्रौढ स्त्री-पुरुष नागरिकांची मिळून ग्रामसभा बनते.

**ग्रामसभेच्या बैठका-**

ग्रामसभा बोलवण्याचा अधिकार सरपंचाला असतो. दहा दिवस अगोदर सुचना काढून, ग्रामसभा बोलवली जाते.

**ग्रामसभेची संख्या-**

प्रत्येक आर्थिक वर्षात ग्रामपंचायतीच्या किमान ४ ग्रामसभा घेणे कायद्याने बंधनकारक आहेत. ग्रामसभा घेण्यास कसूर करणा-या सरपंच किंवा उपसरपंचाला अपात्र ठरविले जाते. वित्त वर्षाच्या प्रारंभानंतर पहिली ग्रामसभा घेतली जाते तर स्वातंत्र दिन, १५ ऑगस्ट रोजी दुसरी ग्रामसभा घेतली जाते. २ ऑक्टोबर, महात्मा गांधी जयंती दिवशी तिसरी ग्रामसभा घेतली जाते तर २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी चौथी ग्रामसभा घेतली जाते.

**महिलांचे ग्रामसभा-**

प्रत्येक ग्रामसभेच्या एक दिवस अगोदर महिलांची ग्रामसभा घेणे बंधनकारक असते.

**ग्रामसभेचे अधिकार व कार्य :**

१) केंद्र व राज्याच्या योजनांच्या लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेत केली जाते.
२) ग्रामपंचायत प्रशासनावर नियंत्रण ठेवते.
३) ग्रामपंचायत प्रशासनाला मार्गदर्शक सूचना करते.
४) ग्रामपंचायतीच्या विकास कार्यक्रम व योजनांना मान्यता देणे.

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

Scanned by CamScanner

५) विकास कामावर केलेल्या खर्चाचा अहवाल ग्रामसभेसमोर ठेवणे बंधनकारक आहे.

६) गाव पातळीवरील सर्व शासकिय व निमशासकिय कर्मचा-यांवर शिस्त विषयक नियंत्रण ठेवणे.

७) ग्रामपंचायतीच्या अंदाजपत्रकाला मंजूरी देणे.

अलीकडील काळात ग्रामसभेमुळे गावपातळीवरील प्रशासनाने अधिक कार्यक्षम व प्रभावी बनल्याचे दिसून येत आहे. लोकांमध्ये आज अधिकार, हक्क आणि कर्तव्य या बाबतीत पुरेशी जागृती झाल्याचे दिसून येते. म्हणून ग्रामसभा ग्रामपंचायत प्रशासनात प्रत्यक्ष लोकशाहीचा मार्ग म्हणून महत्वपूर्ण भूमिका बजावीत असल्याचे दिसून येते.

## संदर्भ सूची :-

१) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८
२) स्थानिक स्वराज्य संस्था प्रा.गोविंद यमलवाड
३) ग्राम विकासाची दिशा आणि पंचायत राज-यशदा पुणे
४) पंचायत राज व ग्रामीण विकास-प्रा.जे.बी.गाडे

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani


Scanned by CamScanner

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Issue [illegible] 05 April to June 2019



Editor
Dr.Bapu G.Gholap

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

26) कलगी–तुरा : शोध आणि बोध
**शेषराव पठाडे, औरंगाबाद** ||117

27) महान समाज सुधारक अरविंद घोष यांच्या कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास
**डॉ. संभाजी संतोष पाटील, जि. धुळे** ||127

28) महात्मा गांधी यांचे ख्रिस्ती धर्माबद्दलचे विचार
**वळवी विश्वास गोरखनाथ, जळगांव** ||131

29) गरिब भारतातील श्रीमंत लोकप्रतिनिधी (एक विश्लेषणात्मक अध्ययन)
**प्रा. शशिकांत जे. चवरे, गोंदिया** ||133

30) 'ब बलीचा' या कादंबरीतील कृषिनिष्ठ जाणिवा
**प्रा. डॉ. आनंद वारके, जि. कोल्हापूर** ||140

31) स्वच्छ भारत अभियान एक दृष्टीक्षेप
**प्रा. डॉ. पी. व्ही. भुताळे, जिल्हा परभणी** ||144

32) टिहरी का प्रेमचंद विद्यासागर नौटियाल
**डॉ० मनीषा अग्रवाल, देहरादून, उतराखण्ड** ||146

33) सौन्दर्य और ललित कलायें
**डॉ० वन्दना अग्रवाल, मेरठ** ||148

34) वराह पुराण में वर्णित भारतीय संस्कृति की आधुनिक संदर्भ में उपादेयता
**जयनाथ झा, दुमका, झारखंड** ||154

35) विभिन्न सामाजिक वर्गो में वैवाहिक आयु अनुसार प्रजननता प्रवृत्ति का विश्लेषण...
**आर. आर. कोचे, जिला राजनांदगांव(छ.ग.)** ||158

36) राम संजीवन प्रसाद के उपन्यासों में चित्रित आदिवासी जनजीवन
**माने रंजना चंद्रकांतराव, जि. लातूर** ||160

37) आधुनिक बैंकिंग और प्रशिक्षण की आवश्यकता
**डॉ. नरेन्द्र पाल सिंह & डॉ. नवनीत कुमार राजपूत** ||164

38) गांधी [illegible] सत्याग्रह, एवं अहिंसा
**विक्रम, कुरूक्षेत्र, हरियाणा** ||169

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)
Estd.1983
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani
www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

*Vidyawarta®*
Peer-Reviewed International Journal

April To June 2019
Issue-30, Vol-05

0144

31

# स्वच्छ भारत अभियान एक दृष्टीक्षेप

प्रा. डॉ. पी. व्ही. भुताळे
सहयोगी प्रा. व संशोधन मार्गदर्शक,
श्री गुरु बुध्दीस्वामी महाविद्यालय पूर्णा(जं.), जिल्हा परभणी

**********

भारत हा महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करित आहे. संपूर्ण विश्वापुढे भारत हा एक स्वच्छ देश म्हणून समोर आणण्याचे व महात्मा गांधीजीच्या स्वप्नाला दिशा देण्याचे काम या अभियाना मार्फत केले जात आहे. स्वच्छता ही मानवी आरोग्याशी निगडीत बाब आहे. स्वच्छता ही मानवाची एक गरज आहे. उत्तम स्वच्छता ही अनेक मोठया आजारांना दूर ठेवते.

स्वच्छ भारत अभियान भारताच्या ४००० हून अधिक शहराचा, रस्त्याचा, व विविध नदीच्या स्वच्छतेसाठी भारत सरकारने सुरु केलेले राष्ट्रीय पातळीवरील अभियान आहे. हे अभियान २ ऑक्टोबर २०१४ रोजी राजघाट नवी दिल्ली येथे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरु झाले. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५०व्या जयंती निमित्त अनोख्या पध्दतीने आदरांजली अर्पण या अभियानाने केली. या अभियानाचा प्रारंभ करतांना सामाजिक,आर्थिक, मनोरंजन,क्रिकेट, राजकीय क्षेत्रातील व्यक्ति एकत्र येवून स्वच्छ भारत निर्माण करण्यकडे पाऊल उचलले. मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हाता झाडू घेउन साफसफाई करत स्वच्छ भारत अभियानाचे उद्घाटन केले. संपूर्ण देशातील व सर्व क्षेत्रातील मान्यवर व जनतेला या अभियानात सामावून घेण्यात आले. स्वच्छतेची शपथ देण्यात आली. **एक कदम स्वच्छता की ओर** या घोषवाक्यात प्रत्येक भारतीयांना सामावून घेण्याचा प्रयत्न केला. महात्मा गांधीजींनी स्वच्छता ही स्वातंत्र्यापेक्षाही अधिक महत्वाची आहे असे मानले होते. म्हणून स्वच्छता व विकासाचा प्राथमिक घटक आहे असे म्हटले तर चूक ठरत नाही.

**उद्देश**

१ उघडयावर शौचास जाणाऱ्या प्रवृत्तीस रोखण्यासाठी भारतातील प्रत्येक घरात शौचालय बांधणे आवश्यक आहे.

२ आधूनिक पध्दतीने शौचालय बांधून त्यांची साफसफाई सुध्दा आधूनिक पध्दतीने केली पाहिजे.

३ घनकचरा व्यवस्थापन, मलनि:सारण, व्यवस्थापन व त्याचा पूनर्वापर करण्याचे संबंधी वैज्ञानिक पध्दत अवलंबली पाहिजे.

४. ग्रामीण भागातील सामान्य लोकांना स्वच्छते बाबत वैयक्तीक जागृती करुन निरोगी आरोग्याशी जोडणे.

५. या अभियानात सहभागी होणाऱ्याना कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासंबंधी मार्गदर्शन करणे.

६. भारतात स्वच्छ आणि प्राकृतिक सौंदर्ययुक्त वातावरण निर्माण करणे.

७. आरोग्य शिक्षणाच्या माध्यमातून समाज आणि पंचायत व्यवस्थेत स्वच्छतेप्रती जागरुकता निर्माण करणे.

**स्वच्छता व आर्थिक विकास**

मानवी जीवनात ज्या प्रमाणे स्वच्छता व आरोग्य चांगले असेल तर त्या व्यक्तिचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. तसेच राष्ट्राचा विकास करण्यासाठी सार्वजनिक स्वच्छता देखील तितकीच महत्वाची आहे. कारण अस्वच्छतेमुळे लहान मुले, महिला व सामान्य माणसांना प्राणघातक आजार होताना दिसतात. दरवर्षी ५ वर्षाखालील ८ लाख मुलाचा मृत्यू डायरियामुळे होतो. उघडयावर शौचास जाणे, लहान मुलाच्या विष्ठेचे योग्य व्यवस्थापन न करणे यामुळे पोलिओ, जंत, कॉलरा पोटाचे आजार होतात. म्हणून आर्थिक खर्च वाढतो नागरिकांच्या आर्थिक विकासाचा खर्च याच कारणावर होतो म्हणून देशाचा आर्थिक विकास होत नाही.

**स्वच्छ भारत अभियानातील अडथळे :**

स्वच्छ भारत अभियानाचे उद्देश चांगले आहेत मात्र ही योजना प्रत्यक्ष अमलात आणतांना अनेक

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal
April To June 2019
Issue-30, Vol-05
0145

अडथळे निर्माण होत आहेत. ते पुढील प्रमाणे.

१ सर्व सामान्य माणसांत आवश्यकत्या प्रमाणात जागृती नाही.

२ कांही लोकांना/कुटूंबाना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यात शासन यंत्रणा कमी पडली.

३ लोकांमध्ये असणारे अज्ञान, अंधश्रध्दा, निरक्षरता इ. बाबी जबाबदार आहेत.

४ गावाचा मोठा आकार, राजकारण, वैचारिक मतभेद इ.

५ जन सहभागाचा अभाव, जन सहभागा बाबत प्रोत्साहन देण्यास यंत्रणा कमी पडते.

६ स्वच्छता अभियान ही एक सेल्फी घेण्यासाठीची अभियान बनले.

७ वर्तमानपत्रात फोटो घेण्यासाठी हातात झाडू घेतला जातो. नंतर अस्वच्छता असते मानसिकता बदलणे गरजेचे आहे.

**स्वच्छ भारत अभियान यशस्वी करण्यासाठीचे उपाय :**

१ स्वच्छताही प्रत्येक नागरिकांची जबाबदारी आहे हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

२ लोकांच्या मनाची स्वच्छता करणे गरजेचे आहे जे पाणी फाउंडेशन व नाम संस्थेने केलेले आहे.

३ गावातील लोकांच्या मनात एकात्मतेची भावना निर्माण करणे.

४ लोकांत शासनाच्या भूमिके बाबत विश्वासाची भावना निर्माण करणे.

५. स्वच्छतेचे महत्व व मानवी जीवनावरील परिणाम लोकांना समजवून सांगणे गरजेचे आहे.

६. शौचालय बांधणे व वापरण्याचे महत्व सांगणे.

७. स्थानिक संस्थावर ग्राम स्वच्छतेची जवाबदारी देणे.

८. ग्राम स्वच्छतेच्या शाश्वत विकासासाठी बक्षिस योजना तयार करणे.

९. पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे.

१०. शौचालय बांधकामासाठी शासनाकडून वेळेवर वित्त पुरवठा करणे महत्वाचे आहे.

११. स्वच्छते संबंधी व्यापक प्रमाणात प्रसिध्दी करणे गरजेचे आहे.

१२. हे अभियान सर्व स्तरावर प्रभावी अंमल करण्यासाठी राजकिय नेतृत्व संवेदनशील होणे आवश्यक आहे. अर्थातच याला राजकिय पाठिंब्याची गरज आहे.

**मुल्यमापन :**

स्वच्छ भारत अभियान हे केवळ ग्रामीण व शहरी विद्यालय, कार्यालय स्तवरावर राबवून उपयोगाचे नाही तर संपूर्ण जनता यात सक्रिय सहभाग घडून, स्वच्छतेची शपथ घेवून प्रमाणिकपणे आपल्यापासून सुरुवात केल्यासच या अभियानाला यश मिळू शकते. व्यक्तिच्या शारिरीक स्वच्छते बाबतही जागृकता आवश्यक आहे. शहरी व ग्रामीण भागात आजही शौचालयाचे गंभीर प्रश्न आहेत. वर्तमानपत्रात एका महिलेने शौचालय बांधण्यासाठी लग्न झाल्या दुसऱ्या दिवशी घर सोडण्याची बातमी वाचली किंवा शौचालय बांधण्यासाठी स्वत:चे मंगळसूत्र विकले हा या अभियानाचा सकारात्मक परिणाम म्हणावा लागेल. किंवा अभिनेत्री विद्याबालन हिने टिव्ही व आकाशवाणी वरील जाहिरातीतून ग्रामीण व शहरी लोकापर्यंत स्वच्छतेचे महत्व पोहचवले आहे. २०२१ पर्यंत संपूर्ण भारत हागणदारी मुक्त होईल हे सागता येणार नाही पण काही प्रमाणात त्याल यश मिळेलच. यात कुठलेही राजकारण नाही केलयास किंवा श्रेयवादाचा संघर्ष निर्माण न झाल्यास, लोक स्वत:हून मनाने स्वच्छतेचे महत्व ओळखून वर्तन केल्यास नक्कीच हे अभियान यशस्वी होवू शकते. केवळ गाजावाजा करुन प्रसिध्दी देवून उपयोग नाही तर यासाठी प्रशासनाची प्रमाणिक भूमिका, नागरिक, स्वयंसेवी संस्था, शासन हे सर्व एकत्र येवून विश्वासाने हे अभियान राबविल्यासच देशाचा विकास होतो. शासन व प्रशासनाची भिती देखील लोकांना वाटली पाहिजे. अस्वच्छता राखणाऱ्या लोकांना दंड लावला पाहिजे. पश्चिमेकडील देशात स्वच्छतेला अधिक महत्व दिले जाते रस्त्यावर कुठेही कचरा टाकला येत नाही. यासाठीचे नियम त्या त्या देशात पाळले जातात म्हणून आपण त्या देशाच्या स्वच्छतेचे कौतुक करतो. तेंव्हा आपण ठरवले तर आपला देश (आपण) स्वच्छ ठेवून विकासाच्या मार्गावर आणी एकत्रित

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani

222

SN 2394-5303



Peer Reviewed International Refereed Research Journal
**Issue-53, Vol-02 May 2019**



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

Editor
Dr Bapu G Gholap

223

14) DISINVESTMENT POLICY IN INDIA AND AIR INDIA FIASCO
Dr. Rajeev Shukla, Mr. Raju Kashyap & Miss. Ayushi Shukla, Lucknow ||55

15) Marginalized Communities- Who, Why, Socio-Economic, Distribution in India
Dr. Amol Tukaram Khade, Dist-Solapur ||58

16) ग्रामीण विकासात जलयुक्त शिवार कार्यक्रमाचे योगदान
प्रा.डॉ. पी.व्ही.भुताळे, जिल्हा परभणी ||60

17) बीड जिल्हयातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या इंटरनेट वापराचा त्यांच्या.... ...
श्रीमती चव्हाण अनिता उत्तमराव ||62

18) ग.दि.माडगुळकरांची काही अजरामर गीते
प्रा.डॉ.सौ. शुभांगी परांजपे ||66

19) ७४ वी घटना दुरुस्ती आणि पंचायतराज
डॉ. संभाजी संतोष पाटील, जि. धुळे (महाराष्ट्र) ||69

20) ओवीगीतांतील भावासंबंधीच्या प्रतिमा, संकेत : एक अभ्यास
प्रा.डॉ. संगीता काकासाहेब शेळके, अहमदनगर ||74

21) डॉ.शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचे शैक्षणिक कार्य
प्रा. डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे, जि. लातूर (महाराष्ट्र) ||76

22) शिक्षक दांपत्यांच्या समस्या
प्रा.प्रकाश सुभाषराव देशमुख & श्री.प्रदिप मधुकरराव पछिनकर, नांदेड ||79

23) 'लिंगभेद' : एक सामाजिक समस्या
डॉ. सतीश गंगाराम ससाणे, अहमदपूर ||83

24) भारतीय दर्शन में अहिंसा
डॉ० प्रिया कुमारी, बिनुसगढ़, हजारीबाग ||86

25) विद्यासागर नौटियाल जी के कथा–साहित्य में धार्मिक उदारता एवं सहिष्णुता
डॉ० मनीषा अग्रवाल, देहरादून, उत्तराखण्ड ||88

26) बेटी बचाओ बेटी पढ़ाओ
डॉ० [illegible] अग्रवाल, कानपुर (उ०प्र०) ||91

Coordinator IQAC Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

ISSN: 2394 5303 | Impact Factor 6.039(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | May 2019 Issue-53, Vol-02 | 060

16

# ग्रामीण विकासात जलयुक्त शिवार कार्यक्रमाचे योगदान

प्रा. डॉ. पी. व्ही. भुताळे
सहयोगी प्रा. व संशोधन मार्गदर्शक,
श्री गुरु बुध्दीस्वामी महाविद्यालय पूर्णा(जं.)
जिल्हा परभणी

**********

भारत हा खेडयाचा देश आहे किंवा खरा भारत खेडया मध्ये राहतो असे राष्ट्रपीता महात्मा गांधीजींचे वाक्य आजही सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्टीने सत्यच वाटते व भविष्यात देखील सत्यच ठरेल. कारण आजही ग्रामीण भागात खुप मोठा जनसमूदाय राहतो. जवळ जवळ ६८टक्के लोक खेडयात राहतात. कृषीक्षेत्राचा राष्ट्रीय विकासात खेडयाचे महत्व अबाधित आहे आज देशातील सर्व जनतेचे पोषण व आहार हा कृषी क्षेत्रातूनच येते व बऱ्याच लहान व मोठया उद्योगाला कच्चा माल देखील पुरवठा केला जातो. म्हणून केंद्र सरकार व राज्य सरकार यांचे प्रमूख लक्ष्य ग्रामीण विकास असतो. तरीही म्हणावा तेवढा ग्रामीण भागाचा विकास झालेला दिसून येत नाही. १९९२ ला ७३ घटना दुरुस्ती करुन लोकशाहीचे विकेंद्रीकरण करण्यांत आले. स्थानिक सरकारला वैधानिक दर्जा देवून, स्वतंत्र वित्त आयोग निर्माण केले. स्थानिक प्रश्नाची सोडवणूक स्थानिक स्तरावरच केली जावी व गावाचा विकास व्हावा यासाठी प्रयत्न केले गेले. गावाचा चेहरा मोहरा बदलावा, त्याचा विकास व्हावा यासाठी अनेक योजना व कार्यक्रम स्थानिक सरकारच्या पुढाकाराने [illegible] अमलात आणले जावू लागले. स्वच्छ भारत अभियान, रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री आवास योजना व जलयुक्त शिवार यासारख्या योजनांच्या माध्यमातून ग्रामविकास [illegible] यांच्याने राष्ट्राचे

महाराष्ट्र शासनाने डिसेंबर २०१४ मध्ये दुष्काळाचा सामना करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान सुरु केले. २०१९ पर्यंत या योजनेची व्याप्ती १८ हजार गावापर्यंत पोहचली आहे. कारण आज पाणी प्रश्न ज्वलंत बनला असून ही जागतिक समस्या बनत चालली आहे. पर्यावरणाच्या प्रचंड ऱ्हासामूळे पर्जन्यमान संपूर्ण बदलून गेले आहे. वर्षागणिक पावसाचे प्रमाण खूपच कमी होत चालले आहे. आज संपूर्ण महाराष्ट्रात पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पिण्याचे पाणी, शेती, उद्योग, विजनिर्मिती, पशुपक्षी,प्राणी, यांच्या वृध्दी व विकासासाठी पाणी, नितांत गरजेचे आहे. म्हणूनच पाण्याला जिवन म्हटले जाते. सर्व वस्तू व सेवा तयार करुन देता येतात मात्र पाणी तयार करता येत नाही. म्हणून नैसर्गिक साधनाद्वारे पृथ्वीवर पडणाऱ्या पाण्याचे योग्य नियोजन करुन सर्व प्राणीमात्राना व शेती, विज, उद्योग यांच्या विकासासाठी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी जलयुक्त शिवार अभियान शासनाद्वारे व कांही स्वयंसेवी संस्था द्वारे जनसहभागातून .मोठया प्रमाणात राबविली जात आहे.

महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचा सिंहाचा वाटा आहे. कृषीचा विकास सिंचनावर अवलंबून आहे. गेल्या अनेक वर्षाचा हिशेब पाहता सिंचन क्षेत्राचा समतोल प्रमाणात विकास झालेला नाही. महाराष्ट्रात १७.५ टक्के वर सिंचन क्षेत्र गेले नाही. देशात केवळ ४३ टक्के एवढेच सिंचन क्षेत्र आहे. १९६५,१९६६,१९७२,१९७९,२००२,२००९, २०१४,२०१५,२०१६ आता २०१९ या वर्षात महाराष्ट्राला भीषण अशा पाणी टंचाईला सामोरे जावे लागले आहे. तेंव्हा यावर विचार करुन शाश्वत विकासासाठी दिर्घकाळासाठी शेतकऱ्यांना व आम जनतेला सुखावण्यासाठी जलयुक्त शिवार योजना सुरु केली. २०१६–१७ शेततळयासाठी २ लाख [illegible] हजार ६२० अर्ज आले त्या पैकी ५१ हजार ३६९ शेततळयाचे कामे पूर्ण झाली. २०४ कोटी रुपये शेतकऱ्यांना दिले गेले.

जलयुक्त शिवार अभियानाचे उद्देश

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani (M.S.)
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

...माने पाणी अडवून जमीनीमध्ये मुरवणे किंवा ...वीर वर्षभर साठवून ठेवणे, नाल्यात व नदीत ...त जास्त दिवस पाणी साठवून ठेवणे यामुळे ...गे कोरडया पडणार नाहीत. कुपनलिकेला विपुल पाणी राहील यासाठी जल व मृद संधारणाची कामे ...णण्यावर भर देण्यात आला. शासना बरोबरच अभिनेता आमिरखान यांच्या पाणी फाउंडेशनचा रुपात महाराष्ट्रात लोक जागृती व लोकसहभागातून पाणी अडवा व पाणी जिरवा यासाठी मोठे क्रांतीकारक ...म महाराष्ट्रात केले त्यामुळे पाणी प्रश्नाची दाहकता ...गी वाटते तसेच अभिनेता नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे यांनी नाम फाउंडेशनच्या माध्यमातून जल संधारणाची आदर्श कामे केलेली आहेत.

उद्देश

१ पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाच्या शिवारातच आडविणे.

२ भुगर्भातील पाणी पातळीत वाढ करणे.

३ राज्यातील सिंचन क्षेत्रात वाढ करणे शेतीसाठी संरक्षीत पाणी व पाण्याच्या वापराची कार्यक्षमता वाढविणे.

४ राज्यातील सर्वांना पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध करुन देणे.

५ ग्रामीण भागातील बंद पाणी पुरवठा योजना पुनर्जीवीत करणे व पाणी पुरवठयात वाढ करणे.

६ पाणी साठवण क्षमता निर्माण करणारी नवी कामे हाती घेणे.

७ अस्तित्वात असलेली मात्र बंद पडलेली जलस्तोत्राची पाणी साठवण क्षमता निर्माण करणे. बंधारे, गाव पाझर तलाव, सिमेंट बंधारे इ.)

८ जलस्त्रोतातील गाळ लोक सहभागातून काढून जलस्तोत्रांचा पाणीसाठा वाढविणे.

९ शेतीसाठी पाण्याचा कायक्षम वापर करण्यासाठी जनजागृती करणे.

१० पाणी अडविणे व ते जिरवणे संबंधी लोकांना प्रोत्साहित करणे.

...विभाग... ठेवून शासनाने ...ठ्या प्रमाणात कामे हाती घेतलेली आहेत. ज्याचे

**जलयुक्त शिवार अभियानाचे कामे :**

१ पाणलोट विकासाची कामे : ढाळीचे बांध बंदिस्ती, शेततळे माती नालाबांध आणि सलग समतल चर, कॉक्रीटनाला, बंधाऱ्याची कामे, नाला खोलीकरण व रुंदीकरणासह कामे

२ जुन्या जलसंरचनेचे पुनर्जीवन करणे:

३ लघू पाटबंधारे सिंचनाची दुरुस्ती करणे.

४ पाझर तलाव,लघू सिंचन, तलाव दुरुस्ती, नुतनीकरण व क्षमता पुनस्थापित करणे.

५ पाझर तलाव / गावतलाव / साठवण तलाव / शिवकालीन तलाव / ब्रिटीशकालीन तलाव / निझाम कालीन तलाव / मातीनाला बांधातील गाळ काढणे.

६ ओढा व नाले जोड प्रकल्प.

७ विहिर / बोअरवेल पुनर्वसन करणे.

८ उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे.

९ पिण्याच्या पाण्याचे स्तोत्र बळकट करणे.

१० पाणी वापर संस्था बळकट करणे.

**जलयुक्त शिवार अंतर्गत मराठवाडयात झालेली कामे**

जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत मराठवाडयातील ८ जिल्हयात पुढील कामे झालेली आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | औरंगाबाद | १७५९ |
| २ | जालना | १५२३ |
| ३ | बीड | १५८९ |
| ४ | परभणी | १६९१ |
| ५ | हिंगोली | १५६८ |
| ६ | नांदेड | २१९२ |
| ७ | लातूर | १७७० |
| ८ | उस्मानाबाद | ४४५२ |

वरील कामातील काही कामे ही प्रगती पथावर

**प्रशासकीय यंत्रणा**

१ जलयुक्त शिवाराची कामे करण्यासाठी विभागीय स्तरावर विभागातील आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विभागिय स्थरावर समन्वय समिती काम करते.

Coordinator IQAC Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)
Estd. 1969
Principal Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Dist. Parbhani

ISSN: 2394 5303 | Impact Factor 6.039(IIJIF) | Printing Area Peer-Reviewed Int

जिल्हास्तरीय समिती कार्यरत असते.

३ उपविभागीय अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली तालुका स्तरावर तालुका स्तरीय समिती कार्यरत असते.

जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत राज्य, विभाग, जिल्हा व तालुका स्तरावर उत्कृष्ट कार्यसाठी विशेष पुरस्कार दिले जातात.

**सारांश :**

जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत झालेल्या कार्याचा परिणाम पाहता यापुढे महाराष्ट्र पाणी टंचाई मुक्त होईल असा विश्वास वाटतो. गेल्या तीन वर्षात १६ हजार ४८१ गावात ही योजना राबविली होती त्यागावात उन्हाळ्यात तीव्र पाणी टंचाई नव्हती. गेल्या तीन वर्षात शासन ७२११ कोटी रुपये खर्च करुन १६ हजार ४८१ गावात योजना राबविली २२ लाख हेक्टर संरक्षीत सिंचन क्षमता असणारे पाणीसाठे निर्माण झाले. शासना सोबतच स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून व प्रत्यक्ष जनतेच्या सहभागातून पाणी आडवा व पाणी जिरवा हे कार्यक्रम अधिक यशस्वी होउ शकते हे पाणी फाउंडेशन व नाम संस्थेने प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले आहे. शासनाच्या योजना म्हटले की त्यात पारदर्शीपणा नसतो, योजनेला दिरंगाई व भ्रष्टाचारासारखा रोग लागतो म्हणून लोकउपयोगी योजना जनसहभागातून यशस्वी होतात ज्यामुळे जलक्रांती झाल्याशिवाय राहत नाही.

**संदर्भ :**

१ लोक सहभाग व ग्रामीण विकास : डॉ. करे बिभीषण

२ भारतीय स्थानिक शासन : डॉ.श्याम सिरसाट

३ लोकराज्य मासिक जानेवारी २०१४.

४ लोक प्रशासन कौशल्य विकास कार्यक्रम : डॉ. रेड्डी

□□□

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Estd. 1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist Parbhani